Uth tube

'त्यांना' धडा शिकवा!














निसर्गाने मानवाला भरभरून दिले आहे. याच निसर्गसंपत्तीचा वापर करून माणसाने स्वतःचे जीवन सुखकर व आरामदायी केले; पण अनेक ऊर्जा संसाधने आता कमी होऊ लागली आहेत. त्यामुळे इंधनाच्या किमती वाढत आहेत. ही चिंतेची बाब लक्षात घेऊन 'द ग्रीन इंडिया इनिशिएटिव' या तरुणांच्या संस्थेने शहापूर येथील एक गाव ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा प्रकल्प हाती घेतला. तोही अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून...



The Green India Initiative

# गुंडे गावात सूर्य उगवला...

**कुणाल गवाणकर**

पेट्रोल, डिझेल दरवाढ आता सामान्य नागरिकांसाठी फारच ओळखीचा शब्द झाला आहे. काही दिवसांनी हा शब्द ब्रेकिंग न्यूज आणि हेडलाईनच्या माध्यमातून आपल्या भेटीला येतो व खिशाला कात्री लागते. सरकार, मंत्री, पेट्रोल कंपन्या यांना चार शिव्या दिल्या जातात व वरच्या पैशाची जुळवाजुळव करून पावले (माफ करा.. पावले नाही.. चाक) पेट्रोलपंपाच्या दिशेला वळते. देशभरातील जनतेसाठी आता काहीच नवे राहिलेले नाही. पेट्रोल, डिझेल आले की भाववाढ आलीच... याची आता साऱ्यांनाच सवय झालीय. पारंपरिक संसाधने मर्यादित आहेत. त्यामुळे मागणी जास्त असल्यावर ती 'भाव' खाणारच; पण अपारंपरिक ऊर्जास्रोत वापरले तर..? नेमकी हीच गोष्ट ओळखून 'द ग्रीन इंडिया इनिशिएटिव' या एका तरुणांच्या संस्थेने शहापूर येथील एक गाव स्वयंपूर्ण करण्याचा प्रकल्प हाती घेतलाय.

सर्व गोष्टी मोफत दिल्या की लोकांना त्याची किंमत नसते. त्यामुळे आम्ही फक्त शाळेपासून या प्रोजेक्ट्सची सुरुवात केली आहे. या प्रोजेक्टमध्ये गावकऱ्यांची साथ फार मोलाची आहे. त्यांचे सहकार्य कायम राहिल्यास पुढील टप्प्यात त्यांच्याही घरात सौरदिवे लावण्यात येतील. त्यामुळे त्यांना लोडशेडिंगचा त्रास होणार नाही व रॉकेल, लाकूड या मर्यादित व पारंपरिक ऊर्जास्रोतांचीही बचत होईल.

मानवाने जो इंधनसाठा (पेट्रोल, डिझेल, रॉकेल, कोळसा) मागील १०० वर्षात वापरला, तो निसर्गात जैविक पद्धतीने तयार व्हायला हजारो वर्षे लागली. आता फार कमी इंधनसाठा जगात शिल्लक आहे. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर करायला हवा, असे द ग्रीन इंडिया इनिशिएटिवचा सचिन शिगवण व अभिषेक दवे यांना वाटते. त्यामुळे सुमारे १२ ते १५ तास लोडशेडिंग असलेल्या शहापूर तालुक्यातील गुंडे गावात एक प्रोजेक्ट त्यांनी सुरू केला आहे. निसर्गात मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या सौरउर्जेचा वापर करून गाव उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. गुंडे या आदिवासी गावातील शाळेपासून या प्रोजेक्टचा पहिला टप्पा यशस्वीपणे सुरू झाला आहे. याचे चांगले परिणामही गावात दिसू लागले आहेत.

द ग्रीन इंडिया इनिशिएटिव ही सामाजिक युवा संस्था गाव दत्तक योजनेच्या माध्यमाने ग्रामीण भागात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्य करते. गुंडे गावातील मुलांना भेडसावणारी वीजसमस्या लक्षात घेऊन येथील चैतन्य विद्यालयाला सौर दिवे देण्यात आले आहेत. यामुळे मुलांच्या सायंकाळच्या अभ्यासाच्या वेळेत वाढ झाली आहे. शाळेला मुलांचे जेवण शिजेल इतका सौरकुकरही हस्तांतरित करण्यात आला आहे. यामुळे शाळेतील मुलांना पौष्टिक व चांगले अन्न मिळते. अनेक घरांतील रॉकेलचा वापर कमी झाल्याने आर्थिक बचतही होऊ लागली आहे. सौरकुकरच्या वापराने जळणासाठी लाकडाचा वापर कमी होऊ लागला आहे. त्यामुळे धुराचे प्रमाणही कमी झाले आहे. याचा उत्तम परिणाम मुलांच्या आरोग्यावर दिसून येत आहे. मोबाईल गावातील तरुणांना आवडू लागल्यानंतर गावात मोबाईल विक्री व दुरुस्ती केंद्रे सुरू झाली. त्याच पद्धतीने गावागावात सौरउर्जेवर चालणाऱ्या उपकरणांची विक्री व दुरुस्ती करणारी केंद्रे सुरू करण्याचा द ग्रीन इंडिया इनिशिएटिवचा प्रयत्न आहे. अपारंपरिक ऊर्जा ही काळाची गरज आहे. इंधानसाठे मर्यादित असल्याने पर्यायी ऊर्जास्रोतांचा प्रभावी व कल्पकतेने वापर होणे गरजेचे आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोत अमर्यादित असल्याने जगभरात अनेक ठिकाणी सौरउर्जेचा वापर वाढला आहे; पण भारत या क्षेत्रात प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत मागेच आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोत फार महाग असतात, त्यांची जोडणी फार गुंतागुंतीची असते, तंत्रज्ञान फार किचकट असते, नियोजन फार खर्चिक असते अशी अनेकांची समजूत असते. अशा अनेक समजुती - गैरसमजुतींचे निराकरण करून अपारंपरिक ऊर्जेचा रोजच्या जीवनात वापर करण्याचे काम द ग्रीन इंडिया इनिशिएटिव करते. ही ऊर्जा इकोफ्रेंडली असल्याने तिच्या वापराचा निसर्गावर कोणताही वाईट परिणाम होत नाही. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. 'सर्व गोष्टी मोफत दिल्या की लोकांना त्याची किंमत नसते. त्यामुळे आम्ही फक्त शाळेपासून या प्रोजेक्ट्सची सुरुवात केली आहे. या प्रोजेक्टमध्ये गावकऱ्यांची साथ फार मोलाची आहे. त्यांचे सहकार्य कायम राहिल्यास पुढील टप्प्यात त्यांच्याही घरात सौरदिवे लावण्यात येतील. त्यामुळे त्यांना लोडशेडिंगचा त्रास होणार नाही व रॉकेल, लाकूड या मर्यादित व पारंपरिक ऊर्जास्रोतांचीही बचत होईल,' असा मानस द ग्रीन इंडिया इनिशिएटिवच्या सचिन शिगवणने व्यक्त केला.